सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्रमांक:**- पीएचआर-१५२१/सी.आर.४४/२०२१/छाननी दिनांक-२३ ऑगस्ट, २०२२

## -:प्रसिध्दीपत्रक:-

**विषय - जाहिरात क्रमांक २७४/२०२१ ते २८१/२०२१ करीता प्रमाणपत्र अपलोड करण्याबाबत**
**संदर्भ - जाहिरात क्रमांक २७४/२०२१ ते २८१/२०२१.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आस्थापनेवरील विविध संवर्गाच्या भरतीकरिता दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ रोजी जाहिराती प्रसिध्द करण्यात आल्या आहेत, त्या खालीलप्रमाणे आहेत:-

| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | पदाचे नाव |
|---|---|---|
| १ | २७४/२०२१ | शरीरविकृती शास्त्रज्ञ, विशेषज्ञ, संवर्ग, गट-अ. |
| २ | २७५/२०२१ | मनोविकृती चिकित्सक, विशेषज्ञ, संवर्ग, गट-अ. |
| ३ | २७६/२०२१ | नेत्रशल्यचिकित्सक, विशेषज्ञ संवर्ग, गट-अ. |
| ४ | २७७/२०२१ | बधिरीकरण तज्ञ, विशेषज्ञ संवर्ग, गट-अ. |
| ५ | २७८/२०२१ | क्ष-किरण शास्त्रज्ञ, विशेषज्ञ संवर्ग, गट-अ. |
| ६ | २७९/२०२१ | अस्थिव्यंगोपचार तज्ञ, विशेषज्ञ संवर्ग, गट-अ. |
| ७ | २८१/२०२१ | वैद्यकीय अधिकारी, (कान, नाक ,घसा तज्ञ) विशेषज्ञ संवर्ग, गट-अ. |
| ८ | २८०/२०२१ | वैद्यकीय अधिकारी, (स्त्रीरोग व प्रसुती तत्र),विशेषज्ञ संवर्ग, गट-अ. |

२. उपरोक्त जाहिरातीमधील परिच्छेद ८ येथे नमूद रुग्णालयाच्या अनुभवासंदर्भात अ. क्र. १ ते ७ वरील जाहिरातीसंदर्भात शासनाने दिलेल्या अभिप्रायानुसार किमान २० खाटांच्या रुग्णालयातील अनुभव आवश्यक आहे. तसेच, अ. क्र. ८ येथील जाहिराती संदर्भात किमान ३० खाटांच्या रुग्णालयातील अनुभव आवश्यक आहे. सदर अनुभवाच्या अनुषंगाने पात्रता तपासण्यासाठी उपरोक्त जाहिरातीस अनुसरुन ज्या उमेदवारांनी आयोगास अर्ज सादर केला आहे, अशा उमेदवारांनी त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या रुग्णालयातील अनुभवाच्या दाव्यांच्या अनुषंगाने खाली नमूद कागदपत्रे/प्रमाणपत्रे अपलोड करणे अनिवार्य आहे:-

| अ.क्र. | कागदपत्रे/प्रमाणपत्रे | फाईल फॉर्मेट | किमान फाईल साईज (KB) | कमाल फाईल साईज (KB) |
|---|---|---|---|---|
| १ | किमान २०/३० खाटांचे रुग्णालय असल्याचे सक्षम प्राधिका-याकडून प्रमाणित केलेले प्रमाणपत्र. | PDF | ५० | ५०० |

३. उमेदवाराने संबंधित रुग्णालयाच्या नाममुद्रित पत्रावर (Letter Head) सक्षम अधिका-याने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र अपलोड करणे आवश्यक राहील.

४. सदर प्रमाणपत्र अपलोड न केलेल्या उमेदवारांचा संबंधित पदांकरिता विचार केला जाणार नाही.

५. उपरोक्त विषयांकित पदासाठी केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने (लागू असलेली) कागदपत्रे/प्रमाणपत्रे PDF करून विहित आकारमानामध्ये आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'ONLINE FACILITIES' अंतर्गत 'Certificates Upload' या मेनूमध्ये दिनांक ३० ऑगस्ट, २०२२ रोजी २३:५९ वाजेपर्यंत अपलोड करणे अनिवार्य राहील.

ठिकाण:-मुंबई

उपसचिव (सरळसेवा-छाननी)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
मुंबई